# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेतील एकूण १५ शाळांना चेंजमेकर एक्सेलेन्स अवॉर्ड**

मिरा भाईंदर महानगरपालिका, कनेक्टिंग ड्रिम फाउंडेशन, BPCL आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी फाऊंडेशन यांच्या सहयोगाने आज गुरुवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी चेंजमेकर एक्सेलेन्स अवॉर्ड या कार्यकामाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या एकूण १५ शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), उपायुक्त (शिक्षण) प्रसाद शिंगटे, सहाय्यक आयुक्त (शिक्षण) दिपाली पवार, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी पदाधिकारी जयवंतराव कुलकर्णी, उमेश मोरे, हेमंत म्हात्रे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

माहे जून २०२४ मध्ये कनेक्टिंग ड्रिम फाउंडेशन, BPCL यांच्यावतीने महापालिका शिक्षकांसाठी समस्या निवारण या विषयाशी निगडीत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे ०३ दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या, समस्याचे समाधान कसे करावे त्यावर उपाययोजना कशी करावी याबाबतचे प्रशिक्षण रामभाऊ माळगी प्रबोधिनी येथे देण्यात आले होते. या प्रशिक्षणात, शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील समस्या सोडवण्यासाठी समस्या सोडवण्याच्या पद्धती शिकून, सराव केला. प्रशिक्षणानंतर, शिक्षकांनी ही कौशल्ये विद्यार्थ्यांना शिकवली आणि विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना समस्या शोधण्यास प्रोत्साहित केले. समस्यांचे प्रकल्प शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी मिळून तयार केले. कनेक्टिंग ड्रीम्स फाउंडेशन या संस्थेने त्याचं मूल्यमापन आणि प्रकल्पाची पाहणी व त्याचे गुणांकन केले. या समस्या निवारण आधारित प्रकल्पांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यासाठी एक पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ आयोजित केला गेला. या कार्यक्रमात, प्रकल्पांच्या अंमलबजावणी, नाविन्यपूर्ण उपाय आणि एकूण कामगिरीच्या आधारे महापालिकेच्या एकूण १५ शाळेतील सर्व सहभागी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना सन्मानित केले.

मिरा भाईंदर महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विविध उपाय योजना, सेंटर ऑफ एक्सलेंस अंतर्गत महापालिका शाळेतील दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरीची हमी, कला क्रीडा महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम यावर महापालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत देखील वाढ होत आहे. तसेच, येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दिनांक ०१ मे रोजी निकालाच्या दिवशी गणवेश वाटपाबरोबर सर्व शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सांगितले.